**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं.०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - थकित - २०२०/२०२०-२१/१२/वेतनपथक, पुणे दिनांक - १० जून, २०२१

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी,

शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

कुलसचिव,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय - १. अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करणेबाबत सन २०२०-२१**

**२. तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधन अदा करणेबाबत यन २०२०-२१**

**३. याचिका क्रमांक ६३४/२०१६**

**महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपॉल्स असोसिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेस**

**विरुध्द**

**महाराष्ट्र शासन व इतर**

उपरोक्त तीनही विषयांबाबत या कार्यालयाच्या विविध पत्रांद्वारे माहिती इ मेल द्वारे सादर करण्याबाबत कळविलेले होते. परंतू बहुतांश महाविद्यालयांनी पाठविलेल्या इ मेल ओपनच होत नाहीत अथवा इ मेल द्वारे सादर करण्यात आलेली माहिती अपुरी व अस्पष्ट असल्यामुळे दिनांक ०२ जून, २०२१ च्या लघुसंदेशाद्वारे उपरोक्त तीनही विषयांची माहिती कुरीअर/स्पीड पोस्टद्वारे पाठविण्याबाबत कळविलेले होते. परंतू अजूनदेखील ब-याच महाविद्यालयांनी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

**त्यामुळे विषयांकित बाबींवरील कामकाजाचा तात्काळ निपटारा करण्याच्यादृष्टीने या कार्यालयाने दिनांक ११ जून, २०२१ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथे कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.**

तरी उपरोक्त तीनही बाबींसाठी या कार्यालयाने यापूर्वी दिलेल्या सूचना विचारात घेऊन उपरोक्त तीन बाबींपैकी कोणत्याही बाबीचे अथवा तीनही बाबींचे प्रस्ताव महाविद्यालयांकडे प्रलंबीत असल्यास त्यांनी उपरोक्त ठिकाणी आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह उपस्थीत रहावे.

या कार्यालयाने दिनांक ११ जून, २०२१ रोजी नौरासजी वाडिया महाविद्यालय, पुणे येथे आयोजीत केलेल्या कार्यशाळेमध्ये जर प्रस्ताव सादर केला नाही आणि त्यामुळे संबंधीतांना लाभ देण्यात आले नाहीत अथवा विलंब झाल्यास याबाबतची सर्व जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/कुलसचिव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे